# महसुल

## १. सीआर/१४३/कोल्हापूर/१४

फिर्यादी हे कोल्हापूर जिल्हयातील भादणवाडी गावचे रहिवासी असून आजरा तालुका स्वस्त धान्यदुकानदार संघटनेचे अध्यक्ष आहेत. आरोपी लोकसेवक श्रीमती उज्वला शामराव सोरटे, तहसिलदार, आजरा यांनी स्वस्त धान्य दुकानांची तपासणी न करण्यासाठी व दुकानांवर कारवाई न करण्यासाठी पैशाची मागणी फिर्यादीकडे केली. तसेच ४ महिन्याचे दर महिना २५ हजार असे रु. १ लाखाची मागणी केली. यावर दुकानदारांशी चर्चा करावी लागेल असे फिर्यादीने सांगितल्यावर चर्चा नंतर करा. प्रथम रु.२५ हजार आणून दया. अशी मागणी आलोसे यांनी केली. पैसे न दिल्यास दुकानदारांवर कारवाई होईल. म्हणून फिर्यादीने दिनांक २१/०२/२०१४ रोजी एसीबी कार्यालयात तक्रार नोंदवली. केलेल्या पडताळणीत आलोसे यांनी रु. २५०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. फिर्यादी यांनी दिलेली लाचेची रक्कम आलोसे यांना त्यांच्या निवासस्थानी स्विकारताना पकडण्यात आले.

त्यानुसार आजरा पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर, भाग—६, गु.र.नं. ७/२०१४, कलम ७, १३(१)(ड) सह १३(२)लाप्रका १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## २. सीआर/३८६/धुळे/१४

फिर्यादी यांनी रुदावली ता.शिरपुर शिवारातील शेतगट नंबर १६३ मधील ०.५३ आर व लौकी. शिरपुर शिवारातील शेत गट नंबर १६२मधील ०.४६ आर ही नवीन शर्थीची कुळवहिवाटीची जमीनीची सौदापावती २०१२ करारनामा करुन खरेदी केलेली आहे. सदरची जमीन सन २०१२ पासून फिर्यादी यांच्या ताब्यात आहे. फिर्यादी यांनी सदर नवीन शर्थीची कुळवहिवाटीची जमीन खरेदी—विक्रीची परवानगी मिळणेबाबत सन २०१२ मध्ये तहसिलदार, शिरपुर यांचेमार्फतीने जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे प्रस्ताव सादर केला होता. तक्रारदार यांनी केलेला प्रस्ताव मंजूर करण्यासाठी कुळवहीवाट शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथील आरोपी लोकसेवक क्र.१ सुभाष बाबुराव दीक्षित नायब तहसिलदार वर्ग—२ व आरोपी लोकसेवक क्र.२ हिलाल शिवराम सोनवणे अव्वल कारकुन यांनी जमीनीची खरेदी विक्रीची परवानगी मिळवून देणेसाठी दिनांक १३/०५/२०१४ रोजी रु. १,००,०००/— लाचेची मागणी करुन ती लाच आरोपी लोकसेवक क्र.२ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील कुळवहिवाट शाखेत स्वीकारली. सदरबाबत धुळे शहर पोलीस ठाणे जि.धुळे गुरनं. ३१५१/२०१४ कलम ७, १३ (१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद

करण्यात येवून दोन्ही आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयात अटक आरोपी लोकसेवक क्र.१ सुभाष बाबुराव दीक्षित नायब तहसिलदार वर्ग—२ यांचे घरझाडतीमध्ये कपाटामध्ये रु. १,४२,०००/— रोख रक्कम मिळून आली व आरोपी लोकसेवक क्र.२ हिलाल शिवराम सोनवणे अव्वल कारकुन यांचे घरझडतीमध्ये रु. ३,६८,०००/— रोख रक्कम मिळून आली.

## ३. सीआर/६४१/उस्मानाबाद/१४

फिर्यादी हे व्यवसायाने शेतकरी असून ते कोंडगाव, तालूका—जिल्हा उस्मानाबाद येथे रहाणारे आहेत. त्यांचे जमीनीचे शेत गट क्र.१४१ मधील १.१७ हेक्टर शेत जमीन आहे. सदर शेत जमीन दोन वर्षापूर्वी तात्कालीन उप विभागीय अधिकारी व भूसंपादन अधिकारी, उस्मानाबाद यांनी नवीन एम.आय.डी.सी. उभारण्याकरीता संपादीत केलेली आहे.

आलोसे श्रीमती शोभा राऊत, उपविभागीय अधिकारी व भूसंपदान अधिकारी, उस्मानाबाद, वर्ग—१ यांनी सदर जमीनीचा मोबदला देण्यासाठी फिर्यादी व इतर साक्षीदार यांच्याकडे मिळणाऱ्या रक्कमेमधील ५ टक्के म्हणजेच रु.३९,२००/— लाचेची मागणी केली. दिनांक १६/०७/२०१४ रोजी आलोसे श्रीमती शोभा राऊत यांना सदर लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. सदरबाबत उस्मानाबाद शहर पोलीस ठाणे जि.उस्मानाबाद गुरनं. ५०/२०१४, कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयात आलोसे श्रीमती शोभा राऊत यांचे घरझडतीमध्ये रु.९५,०७,३७७/— मालमत्ता व चौकशीमध्ये रु.८०,३९,३७७/— **अपसंपदा** संपादित केल्याप्रकरणी स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

## ४. सीआर/१९४/नाशिक/२०१५

आलोसे संदिप पाटील, उपविभागीय अधिकारी वर्ग १ व इतर २ लिपीक तक्रारदार व त्यांचे कुटूंबियांचे नांवे मौजे झोडगे शिवारात शेत गट नंबर ३९४/२ क्षेत्र २ हेक्टर ही शेतजमीन आहे. त्यापैकी ८० गुंठे जमीन बिनशेती करणे असल्याने त्यांनी दिनांक १०.२.२०१३ रोजी अर्ज केला होता. तक्रारदार यांनी वेळोवेळी उपविभागीय अधिकारी कार्यालय, मालेगांव येथे जाऊन आलोसे संदिप गुलाबराव पाटील, उपविभागीय अधिकारी व ज्ञानेश्वर शांताराम बागडे, लिपीक यांची भेट घेवून बिनशेतीची परवानगी मिळणेकामी विनंती केली असता आलोसे पाटील यांनी परवानगी देणेसाठी रु.२,००,०००/— व आलोसे बागडे लिपीक यांनी रु.७५,०००/— लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी रक्कम कमी करणेबाबत विनंती केली असता आलोसे पाटील यांनी रु.१,५०,०००/— व आलोसे बागडे यांनी रु.७५,०००/— द्यावे लागतील असे म्हणून एकूण रु.२,२५,०००/— लाचेची मागणी केली. तक्रारदार यांनी त्याबाबत अॅ.क.ब्युरो कार्यालय, नाशिक येथे तक्रार केलेनंतर दि.२५.२.२०१५ रोजी सापळा आयोजित केला असता आलोसे पाटील, उपविभागीय अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे रु.१,५०,०००/— लाचेची मागणी करुन सदरची रक्कम लिपीक बागडे यांचेकडे देण्यांस सांगितले. तक्रारदार यानी लिपीक बागडे यांची भेट घेतली असता लिपीक बागडे यांनी साहेबांचे दिड लाख रुपये व माझे व अव्वल कारकुन गायधनी अशा दोघांचे रु.७५,०००/— दया असे म्हणून आलोसे बागडे यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, मालेगांव येथे १०.५५ वाजता रु.२,२५,०००/— लाचेची रक्कम स्विकारुन सदरची रक्कम आलोसे हर्षल बाळकृष्ण गायधनी अव्वल कारकून यांचेकडे दिली. आलोसे गायधनी यांनी सदरची रक्कम त्यांचे कार्यालयातील कपाटात ठेवून घेतली असता त्यांना पकडण्यांत आलेले आहे.

याबाबत आलोसेविरुध्द छावणी पोलीस ठाणे मालेगांव गुरनं. ३००९/२०१५, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड,)सह १३(२प्रमाणे प्रमाणे दिनांक २५.२.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आलेला आहे. आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यांत आलेली आहे.

## ५. सिआर/११३/औबाद/१५

फिर्यादि यांच्याकडे किरकोळ रॉकेल विक्रीचा परवाना असुन त्यांना परवान्यानुसार ४०० लिटर रॉकेलच्या कोटयाप्रमाणे माहे जानेवारी २०१५ मध्ये त्यांचा २०० लिटर कमी केलेला रॉकेलचा कोटा पुन्हा देण्यासाठी आलोसे अभय देविदास म्हस्के, वय—३३, तहसिलदार तथा अन्न धान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद, वर्ग—१ यांनी दि. ०३/०२/२०१५ रोजी त्यांचे अन्न धान्य वितरण अधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे रु.२५,०००/— लाच स्विकारली.

याबाबत पोलीस स्टेशन सिटीचौक, औरंगाबाद शहर येथे गु.र. नं. ३००७/१५ कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आलेली आहे.

## ६. सिआर/५८/नाग/१५

फिर्यादी यांचा ट्रॉन्सपोर्टचा व्यावसाय आहे. फिर्यादी यांचे ट्रकने विटा, रेती, राखड, राबीस याची वाहतुक कामठी तहसिल परिसरात करून देण्यासाठी व कार्यवाही न करण्याकरीता आरोपी लोकसेवक प्रदीप गोपीनाथ, परिविक्षाधीन नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कामठी, नागपूर यांनी रु.१०,०००/— लाच रक्कमेची मागणी केली.

दि. १९/०१/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक प्रदीप गोपीनाथ वर्पे, यांनी तडजोडीनंतर आरोपी क्र. २ विकास बळीराम शेबे, खाजगी ईसम यांचे मार्फतीने तक्रारीकडुन रु.७,०००/— लाच रक्कम स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत पो.स्टे. कामठी, जि नागपूर ग्रामिण येथे अप. क्र. ३००४/२०१५ चे कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.